# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०१७/प्र.क्र.१३/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

विषय :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मतपत्रिकेवरील उमेदवारांची नावे मुद्रीत करण्याबाबत...

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए मधील तरतुदीनुसार पंचायत व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षक आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता व अचूकता आणण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सन २००४ पासून सुरुवात केली आहे.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या बॅलेट युनिटचा आकार निश्चित असून दोन उमेदवारांच्या नावामध्ये असणारे अंतर हे देखिल निश्चित आहे. तसेच बॅलेट युनिटवर चिकटविण्यात येणाऱ्या मतपत्रिकेवर दर्शविण्यात येणारी उमेदवारांची नावे व दर्शविण्याची कार्यपद्धती निश्चित आहे. परंतु राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, मतपत्रिका छपाई ही शासकीय मुद्रणालय किंवा खाजगी मुद्रणालयातून केली जात असल्याकारणाने उमेदवाराच्या नावाची छपाई करताना विविध आकाराचा फॉण्ट वापरण्यात येतो व त्यामुळे अनेक उमेदवारांकडून नाव व चिन्ह अस्पष्ट असल्याच्या तक्रारी प्राप्त होतात.

तरी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतपत्रिकेवरील फॉण्ट आकाराबाबत एकसूत्रता आणण्याच्यादृष्टीने आदेशित करण्यात येते की, बॅलेट युनिटवर चिकटविण्यात येणाऱ्या मतपत्रिकेवर उमेदवारांची नावे ही UNICODE मधील DVB-TTYogesh मराठी-२४ पॉईंटच्या आकारात मुद्रीत करण्यात यावीत. (नमुना सोबत जोडला आहे.)

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि.ज.वागळे)
अवर सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
३) सर्व शासकीय मुद्रणालय
४) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी/ सर्व कार्यासने
५) मा.आयुक्त यांचे स्वीय सहायक
६) सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
७) निवड नस्ती

SCAN 3 (ECIL) New (30-1-2017)

Y-2262—A

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक—२०१२
प्रभाग क्र. १२, मतपत्रिका

No

२ मोंहम्मद अहमद मुख्तार
खान ऊर्फ अहमद नेता



OK 24 pt